# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १४४४/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. आशिष रमेशराव ढोकणे, मु. इसापूर, पो. नांदोरा(ड), ता. देवळी जि. वर्धा-४४२१०१ | पंचायत विभाग, जिल्हा परिषद, वर्धा, ता.जि. वर्धा | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं), जिल्हा परिषद, वर्धा, ता.जि. वर्धा |

**सुनावणी दिनांक :- १९.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : दि. २८.०५.२०२२

(२) द्वितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. ०२.०६.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती प्राप्त झालेली नाही.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कुठलाही आदेश प्राप्त झालेला नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : दि. ०४.११.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. ०४.११.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : कालावधी नमुद नाही.

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : केंद्र शासन पुरस्कृत कंपनी सीएससी-एसपीव्ही च्या माध्यमातून जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत येत असलेल्या ग्राम पंचायत मध्ये सीएससी च्या माध्यमातून आपले सरकार प्रकल्प डिसेंबर २०१६ पासून कार्यरत असून २०१६ पासून जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतीची माहिती पुढील मुद्दयांच्या आधारे मिळणेबाबत १) २०१६ ते मार्च २०२० पर्यंत आपले सरकार सेवा केंद्रास सीएससी-एसपीव्ही च्या माध्यमातून ग्राम पंचायतीला किती टोणर किती रिम वितरीत केले ग्राम पंचायतीच्या लेटर पॅडवर प्रत्येक ग्रामपंचायतीची सविस्तर माहिती. २) २०१६ ते मार्च २०२० पर्यंत आपले सरकार सेवा केंद्रास सीएससी-एसपीव्ही च्या माध्यमातून ग्राम

पंचायतीमधील हार्डवेअर कम्प्युटर प्रिंटर दुरुस्ती व नविन प्रिंटर/संगणक सीएससी च्या माध्यमातुन उपलब्ध करुन दिले. ग्राम पंचायतीच्या लेटर पॅडवर प्रत्येक ग्राम पंचायतीची सविस्तर माहिती, ३) २०१६ ते मार्च २०२० पर्यंत आपले सरकार सेवा केंद्रास सीएससी-एसपीव्ही च्या माध्यमातून ग्राम सेवक आणि केंद्र चालकांना माहिन्यातून किती वेळा सॉप्टवेअर चे ट्रेंनिंग देण्यात आले ग्राम पंचायतीच्या लेटर पॅडवर प्रत्येक ग्राम पंचायतीची सविस्तर माहिती.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०८.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत विभाग) जिल्हा परिषद, वर्धा यांनी अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सर्व पंचायत समिती यांच्याशी संबंधीत असल्याने सदर अर्जा मधील माहिती ग्रामपंचायत संबंधीत असल्यामुळे आपण आपल्या स्तरावरुन याबाबत आपल्या अंतर्गत येत असलेल्या सर्व ग्रामपंचायतीस श्री. आशिष ढाकणे यांना नियमानुसार परस्पर माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश द्यावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा, असे कळविण्यात आले.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : दि. १५.१२.२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. १५.१२.२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती पुरविली नसल्यामुळे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक २१.०२.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान अर्जदारांनी मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. सदर माहिती पंचायत समिती स्तरावरची व ग्राम पंचायतशी संबंधीत आहे. पंचायत समिती स्तरावर व प्रत्येक ग्राम पंचायतीवर स्वतंत्र जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केली असल्यामुळे अपिलकर्ता श्री. आशिष ढाकणे यांनी सदर माहिती करीता पंचायत समिती तथा ग्रामपंचायतीला स्वतंत्र अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. सदर अपील या स्तरावरुन निकाली काढण्यात येत आहे असा आदेश पारीत करण्यात आला.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा** — आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आज आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे.

१) आज सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपीलार्थी यांनी ऑनलाईन पध्दतीने २०१६ ते मार्च २०२० पर्यंतची माहिती मागितलेली आहे. मागितलेल्या माहितीचा उल्लेख अर्धवट आहे. मागितलेल्या माहितीचा कालावधी कुठून कुठे सुरु होतो त्याचा बोध होत नाही. माहितीसाठी ग्राम पंचायतीकडे माहितीचा अर्ज पाठविला आहे.

२) प्रथम अपील आदेशात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेशात अर्जदाराने मागितलेली माहिती जिल्हा परिषद विभागात उपलब्ध नसल्यामुळे, पंचायत समिती स्तरावर व ग्राम पंचायत स्तरावर स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांनी पंचायत समिती किंवा ग्राम पंचायत स्तरावर स्वतंत्र अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे आदेश देवून अपील निकाली काढले आहे.

६. **निष्कर्ष –**

१. अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती देण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाची प्रमाणाबाहेर साधनसामुग्री वळवावी लागेल. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ७(९) व महाराष्ट्र माहितीचा अधिकार (सुधारणा) नियम २०१२ मधील नियम ३(क) नुसार ही माहिती देय नाही. माहितीचा कालावधी २०१६ ते २०२० असा असून दिनांकाचा उल्लेख नाही. माहिती कोणत्या तारखेपासून ते कोणत्या दिनांकापर्यंत हवी आहे याचा बोध होत नाही.

२. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही संयुक्तिक आहे. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १९.१२.२०२४**

जावक क्रमांक 1100 दिनांक 7 MAR 2025

जोशी1444/2022 ढोकणे